डिसेंबर - २००७

# महाराष्ट्र राज्याच्या दोन आयुक्तांचे भिन्न आदेश

महाराष्ट्र राज्यातील सर्व सहकारी संस्थांची नोंदणीकृत संख्या पावणे दोन लाखांच्यापुढे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम १९६१ नुसार या सर्व संस्था नोंदणीकृत आहेत. परंतू उदाहरणादाखल व सर्व राज्याला विचार करावा लागणारा विषय व वस्तुस्थिती आजच्या अग्रलेखात मी जाहीर करीत आहे.

महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त व महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त यांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाने केलेली आहे. हे दोन्हीही आयुक्त हे आय.ए. एस. अधिकारी आहेत. राज्यात १६ हजारांच्यावर पतसंस्थांना मंजूर कर्जाच्या रकमेतून करावयाच्या कपातीबाबत राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी दिनांक ३१/०५/२००५ रोजी एक परिपत्रक खालीलप्रमाणे लागू केलेले आहे.

**<u>मा. सहकार आयुक्तांचे ''परिपत्रक''</u>**

विषय : नागरी सहकारी पतसंस्था कर्जवाटप करताना कर्जातून करत असलेल्या बेकायदेशीर कपातीबाबत...

या कार्यालयास असे निदर्शनास आलेले आहे की, नागरी सहकारी पतसंस्था कर्जवाटप करताना कर्ज वाटपाच्या रकमेतून शेअर्स रक्कम (२.५ टक्के ते ५ टक्के), ठेव रक्कम (२.५ टक्के ते ५ टक्के) इमारत निधी रक्कम (१ टक्के ते १.५ टक्के) तसेच संस्थेच्या संचालकांशी संबंधित वेगवेगळ्या ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणीकृत करण्यात आलेल्या ट्रस्टसाठी निधी रक्कम (प्रत्येकी १ टक्का) याप्रमाणे कपाती करीत असतात. सदर कपातीचे प्रमाण एकुण कर्ज रक्कमेच्या १० टक्के ते १५ टक्के असते. वास्तविक कर्जदारास त्याच्या गरजेप्रमाणे कर्जवाटप होणे अत्यंत आवश्यक आहे. तथापी अशाप्रकारे कर्जाच्या रकमेतून मोठ्या प्रमाणात बेकायदेशर कपाती केल्यामुळे गरजेप्रमाणे कर्जदारास कर्ज पुरवठा होत नाही. प्रत्यक्षात जी रक्कम हातामध्ये मिळालेली नाही, त्या रक्कमेवरही व्याज कर्जदारास कर्जाची रक्कम संपेपर्यंत भरावी लागते. अनावश्यक भुर्दंड कर्जदारावर पडून प्रत्यक्ष मंजूर रकमेपेक्षा कमी रक्कम मिळूनही व्याज मात्र मंजूर रकमेवर भरावे लागत असल्याने व गरजेपेक्षा कमी रक्कम प्रत्यक्षात हातात पडल्याने त्याचा विनियोग योग्यरित्या होत नाही. व सदरची कर्ज रक्कम थकीत राहण्याची जास्त शक्यता असते. **अशाप्रकारे कर्जदारास वेठीस धरण्याचे काम संस्था पातळीवर केले जाते ही बाब अतिशय गंभीर आहे.**

या कार्यालयाने यापूर्वीही परिपत्रकाद्वारे शेअर्स रक्कम वगळता इतर कोणत्याही रकमेची कपात कर्ज रकमेतून करू नये अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. तथापि त्याची **अंमल बजावणी** संस्था पातळीवर होताना दिसून येत नाही. इमारत निधीची उभारणी ही झालेल्या नफ्यातून करण्याची **सहकारी कायदा नियम व पोटनियमानुसार तरतूद आहे** व सदर तरतूद संस्थांना बंधनकारक आहे. सदरबाबत सर्व नागरी पतसंस्थांना या

परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, अशा प्रकारच्या बेकायदेशीर कपाती संस्था पातळीवर करण्यात येऊ नयेत.

संबंधीत विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक यांनी अशा प्रकारच्या कपाती कार्यक्षेत्रातील नागरी पतसंस्थांमध्ये होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. **अशा बाबी निदर्शनास आल्यावर संबंधीत संचालक मंडळाने सहकारी कायदा नियम व पोटनियमातील तरतुदींचे पालन केले नाही असे समजून संबंधीत संचालक मंडळाने सहकारी** कायदा नियम व पोटनियमातील तरतुदींचे पालन केले नाही असे समजून संबंधीत संचालक मंडळावर **त्याची जबाबदारी निश्चित करणेबाबत कायदेशीर** कारवाई केली जाईल असे पहावे.

– – –

## मा. साखर आयुक्तांचे ''परिपत्रक ''

उलटपक्षी राज्याचे मा. साखर आयुक्त राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत ह्या कायद्याच्या उलट नियमितपणे परिपत्रक काढीत आलेले आहेत. दिनांक ०१/०९/२००५, ३०/०९/२००५, ०२/०८/२००६,३०/०७/२००७ ह्या दिवशी मा. मंत्री समितीचे बैठकीचे कार्यवृत्ताचे आधारावर खालील अर्थाचे आदेश दिलेले आहेत.

१. नवीन प्रकल्प उभारणीकरिता अपुरे पडलेल्या स्व:भाग भांडवलाच्या ठेवीची कपात ऊस बिलातून सक्तीच्या कपाती करण्याची मुभा कारखान्यास राहिल.

२. सभासदांच्या ऊस बिलातून ऐच्छीक ठेवीच्या कपाती करता येतील.

३. नवीन प्रकल्पांकरिता वित्तीय संस्थांच्या कर्जा ऐवजी नवीन ठेवी स्विकारता येतील.

४. नवीन प्रकल्पाकरिता सभासदांच्या ऊस बिलातून यापूर्वी कपात केलेल्या **ठेवीस मुदतवाढ देता येईल.**

५. वित्तीय संस्थांचे मुदत कर्ज फेडीसाठी बिन परतीच्या / परतीच्या ठेवी स्विकारता येतील.

६. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, साखर संकुल निधी, अल्प बचत निधी, शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून, **इमारत निधी** कपाती करता येतील.

परंतू अलिकडच्या काळात अनेक शेतकरी, विविध न्यायालये, व लोक आयुक्त यांचेकडे तक्रारी करू लागले असल्यामुळे, त्यांच्या आदेशास अधिन राहून ह्या कपाती करता येतील. असेही या मंत्री समितीच्या आदेशामध्ये जाणीवपूर्वक निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

ह्यावरून आपल्या निदर्शनास आले असेलच की, पतसंस्था व साखर कारखाना या दोन्हीही सहकारी संस्था

सहकार कायद्यानुसार नोंदणी झालेल्या आहेत. साखर कारखान्यावर १०० टक्के नियंत्रण हे मा. साखर आयुक्तांचे आहे, व पतसंस्थांवर नियंत्रण हे १०० टक्के मा. सहकार आयुक्तांचे आहे. परंतू कायदा दोघांसाठीही एकच आहे. मग अशा परिस्थीतीमध्ये ज्या पतसंस्था आपल्या सभासदांच्या ठेवी मुदत संपताच किंवा मुदतीपूर्वी मागता क्षणी परत करतात व कराराप्रमाणे ठेवींवरील व्याजही नियमितपणे देतात व ज्या पतसंस्थांनी आर्थिक अडचणीत असलेल्या सर्व सामान्य माणसास, शेतकऱ्यास आर्थिक पाठबळ उभे केले व त्यांच्या आर्थिक उत्थानास मदत केली, त्यांच्यासाठी ठेवी व इमारत निधी कर्जातून कापण्याच्या मनाईचे परिपत्रक काढणे व जे साखर कारखाने १५-२० वर्षांपूर्वी ऊसाच्या बिलातून परस्पर  कपाती केलेल्या ठेवींच्या रक्कमा परत देत नाही व व्याजही नियमितपणे देत नाही, त्यांना मात्र मा.साखर  आयुक्त ह्या सहकार कायद्याचे उल्लंघन करून कशी काय परवानगी देतात, हाच खरा प्रश्न असून इथे पुन्हा सर्वसामान्य माणसाचे व शेतकऱ्यांचे जाणीवपूर्वक आर्थिक कंबरडे मोडले आहे.

**मरता येत नाही म्हणून जगायचे** अशी गत शेतकऱ्यांची व सर्वसामान्यांची  राज्यातील काही अपवाद वगळता साखर कारखानदारांनी केली आहे. आणि ह्याबाबत कायद्याची अंमलबजावणी करणारे दोन आयुक्त परस्पर एकाच विषयासाठी वेगवेगळे व आश्चर्यजनक व अन्यायकारक निर्णय घेतात, हे आपल्या सर्वांच्या लक्षात यावे, यासाठी हा विषय मांडलेला आहे. **जी रक्कम देय नाही शिवाय जे घेतलेले पैसे परत देण्याची ज्यांची दानत नाही,** व **ज्यांचा इतिहासही तसा नाही** त्यांना मात्र ऊसाच्या बिलातून ठेवी, देणग्या, निधी, कपाती करण्याचे बेकायदेशीर अधिकार परिपत्रकाद्वारे प्रदान करावयाचे व ज्या पतसंस्था वेळेत ठेवी व व्याज देतात, त्यांना मात्र दुसऱ्या आयुक्तांनी बंदी घालावयाची, **हा लोकशाहीचा पराजय आहे.** एक दिवस याचा उद्रेक व अन्यायाच्या ज्वालामुखी प्रज्वलीत झाल्या शिवाय राहणार नाही. त्यासाठी सर्व सामान्यांनी व शेतकऱ्यांनी आतापासून त्या दिवसाची प्रचीती घेण्यासाठी व यशस्वीततेसाठी प्रखर मुकाबला करायला पाहिजे. एवढेच या निमीत्ताने विदीत करीत आहे.

ज्यांच्या क्रांतीसाठी सत्ता व पैसा व दोन्हीतून तयार केलेल्या माणसांचा समुह जास्त काळ समाजामध्ये टिकून राहू शकत नाही. एवढ्यावर आपण सर्वांनी विश्वास ठेवावा. तरच ज्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाचे संविधान सर्वांसाठी लिहीले व ज्या सहकाराला १०० वर्षे पूर्ण झाली त्या शताब्दी वर्षाला, खऱ्या अर्थाने प्रणाम ठरेल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**